बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | रविवार, दि.२९सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## तिकिटांचा काळा बाजार

मुंबई:कोल्ड प्ले हा जगभरात नावाजला गेलेला बँड जानेवारी २०२५ मध्ये नवी मुंबईत त्यांचा कार्यक्रम सादर करणार आहे. म्युझिक ऑफ दी स्फीअर्स वर्ल्ड टूर २०२५ असं या कार्यक्रमाचं नाव आहे. या कार्यक्रमाच्या तिकीटांची ऑनलाईन विक्री सुरू केल्यानंतर काही मिनिटात सर्व तिकीटं विकली गेली. या कार्यक्रमाच्या तिकीटासाठी चाहत्यांनी तब्बल ३ लाखांपर्यंतची रक्कम मोजली. दुसऱ्या बाजूला या कार्यक्रमाचं तिकीट मिळालं नसल्याने अनेक चाहते नाराज झाले आहेत. यामुळे बुक माय शो या संकेतस्थळाच्या मूळ कंपनीविरोधात पोलिसांनी समन्स बजावलं आहे. बुक माय शो वर प्रचंड टीका झाल्याने त्यांनी आता यासंदर्भातील निवेदन सादर केलं आहे.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

### दुःखदः सुनीलच्या जाण्याने गावावर शोककळा



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील २५ वर्षीय युवकाने पत्र्याच्या शेडच्या आडूला गळफास घेत आत्महत्या केली. सुनील भास्कर थोरात असे या युवकाचे नाव आहे. सुनील याने शुक्रवारी(दि. १८) मध्यरात्री गळफास घेतल्याचे समजते. सकाळी वडिलांनी शेडचा दरवाजा उघडला असता सुनीलने शेड मधील आडूला गळफास घेतल्याचे आढळून आले. सिरसाळा येथिल ग्रामीण रुग्णालय मरणोत्तर तपासणी करण्यात आली तर दुपारी एक वाजता गाढे पिंपळगाव येथील स्माशन भूमीत सुनील वर अंत्यसंस्कार करण्यात आले.येथे याप्रकरणी सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सुनीलच्या अवेळी जाण्याने कुटुंबासह गावावर शोककळा पसरली आहे.

# Electrol Bond प्रकरण भाजपला भोवले!

## अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अडचणीत वाढ

### निवडणूक रोखेसंदर्भात गुन्हा झाला दाखल!
### न्यायालयाने दिले बेंगळुर पोलिसांना कारवाईचे निर्देश
### इतरांच्या मागे ईडी लावणाऱ्यांच्या मागे लागली पीडा?

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बेंगळुरू पोलिसांनी शनिवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) अधिकारी आणि काही भाजपा नेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रद्द केलेल्या निवडणूक रोख्यांच्या (एश्रशलींश्र इेपव) योजनेशी संबंधित तक्रारीच्या संदर्भात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

विशेष न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम ३८४ (खंडणीसाठी शिक्षा) आणि १२०बी (गुन्हेगारी कट) अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला. 'जनाधिकार संघर्ष परिषद' (गङ्ग) चे सह-अध्यक्ष आदर्श आर अय्यर यांनी दाखल केलेल्या तक्रारीत कर्नाटक भाजपाचे प्रमुख आणि बी एस येडियुरप्पा यांचा मुलगा बी वाय विजयेंद्र आणि पक्षाचे नेते नलिंकुमार कटील यांचाही समावेश आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार तक्रारदाराने आरोप केला आहे की, आरोपींनी निवडणूक रोख्यांच्या नावाखाली खंडणी उकळली आणि आठ हजारांहून अधिक कोटी रुपयांचा फायदा करून घेतला.जनाधिकार संघर्ष परिषदेचे (गङ्ग) आदर्श अय्यर यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याविरोधात बेंगळुरूमध्ये तक्रार दाखल केली होती. तसेच निर्मला सीतारमण यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती. आदर्श अय्यर यांनी दाखल केलेल्या तक्रारीत निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून वसुली केल्याचा आरोप करण्यात आला होता. या याचिकेवर न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने बंगळुरू पोलिसांना एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. आता या प्रकरणावर पुढील सुनावणी १० ऑक्टोबर रोजी होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या अवघ्या काही आठवड्यांपूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये नरेंद्र मोदी सरकारच्या २०१८ च्या राजकीय निधीची निवडणूक रोखे योजना असंवैधानिक, मनमानी आणि अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारी असल्याचे म्हटले होते.




### इलेक्टोरल बॉंड म्हणजे काय?

केंद्र सरकारने २०१७ मध्ये निवडणूक रोखे योजना जाहीर केली होती. ही योजना सरकारने २९ जानेवारी २०१८ रोजी कायदेशीररीत्या लागू केली. या निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना निधी दिला जात होता. राजकीय पक्षांना निधी देण्यात येणाऱ्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता सुधारण्याचे उद्दिष्ट यामागे होते असं सांगितलं जातं. मात्र, यावरून देशभरातून प्रचंड टीका झाली आणि पुढे सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केली. दरम्यान, याच निवडणूक रोखे योजनेच्या माध्यमातून वसुलीच्या आरोपावरून आता निर्मला सीतारमण यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## अक्षय शिंदे चकमकीचा लवकरच उलगडा!

### तपास: वकिलांनी उभा केला चकमकीचा प्रसंग



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथील एका शाळेतील दोन चिमुकल्यावरील अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा ठाणे पोलिसांच्या चकमकीत मृत्यू झाला असून याच घटनेचा प्रसंग अक्षय चे वकील अमित कटारनवरे यांनी शनिवारी पुन्हा उभा केला. त्यावेळी समोर आलेल्या बाबींच्या नोंद करत त्या न्यायालयात मांडून या प्रकरणाचा लवकरच उलगडा करणार असल्याचा दावा अमित यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना केला.बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्यांवरती अत्याचार झाला होता. या प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिसांच्या चकमकीत मृत्यू झाला असून यानंतर विरोधकांकडून विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. तर, सत्ताधाऱ्यांनी पोलिसांची पाठराखण केली होती. यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू असतानाच, अक्षयचे वकील अमित कटारनवरे यांनी शनिवारी सायंकाळी तळोजा ते मुंब्रा बाह्यवळण मार्ग आणि तेथून पुढे कळवा रुग्णालय असा प्रवास करून त्या दिवशीच्या घटनेचा प्रसंग पुन्हा उभा केला. यामध्ये पोलिसांनी तक्रारीत नोंदविलेली वेळ आणि घटनाक्रम याची तपासणी करून त्यांची नोंद केली. याशिवाय पान २ वर...

## केसरी बक्षीस कोण पटकवणार!

### राजेंद्र मस्के: बीड बैलगाडा शर्यतीचे मैदान सज्ज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने आज संपन्न होत असलेल्या मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे भव्य मैदान सुसज्ज झाले असून, बीडचे मैदान कोण गाजवणार आणि मराठवाडा केसरी सोनालीका ट्रॅक्टर कोण पटकावणार ? याकडे महाराष्ट्रातील लाखो हौशी शेतकरी बांधवांमध्ये उत्सुकता शिगेला पोहचली आहे. बीड येथे सकाळी ०९.०० वा. तळेगाव शिवार,भोंडवे पेट्रोल पंपासमोर मैदान सुरु होणार आहे. रंजक प्रेक्षणीय बैलगाडी शर्यतीचा आनंद घेण्यासाठी शेतकरी बांधवानी प्रचंड संखेने उपस्थित राहावे असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



बैलगाडा शर्यतीसाठी सात धावपट्ट्याचे मैदान तयार केले असून, गट पद्धतीने ही शर्यत संपन्न होणार आहे. प्रत्येक फेरीत सात बैलगाड्या धावतील, यात विजयी स्पर्धक पान २ वर...

## मांजरा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण

### खा.बजरंग बप्पा सोनवणेंच्या हस्ते झाले जलपूजन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

यंदा जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडला, त्यामुळे धनेगाव येथील मांजरा धरण पूर्ण क्षमतेने भरले. धरणाचा हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या जीवनात नवा आशेचा किरण आहे. जिल्ह्याचा लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांचे तसेच सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कायम कटिबद्ध आहोत. असे प्रतिपादन खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केले.

केज तालुक्यातील धनेगाव येथे असलेला मांजरा धरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. त्यानिमित्ताने शनिवार (दि.२८) रोजी जलपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी खा.बजरंग बप्पा सोनवणे बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, आपली शेती समृद्ध करण्यासाठी, जलसंपत्तीचे महत्त्व आणि तिचा योग्य वापर करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. हा प्रकल्प झाल्यापासून शेतीक्षेत्र ओलीताखाली आले आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील सुटलेला आहे. गतवर्षी बीड पान २ वर...

## पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार!

### मावेजा न दिल्याने शेतकऱ्यांनी अडवल्या गाड्या



लिंबागणेश/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन बीड तालुक्यातील बालाघाटावरील बेलगाव येथील शेतकरी सुमंत कोंडीबा कोळपे आणि ईश्वर परमेश्वर कोळपे यांनी पवनचक्कीचे काम करण्यासाठी आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गाड्या अडवून धरल्या आणि आमच्या जमिनीचा मोबदला मिळाल्याशिवाय आमच्या शेतातुन गाड्या जावू देणार नाहीत अशी आक्रमक भूमिका घेतली. रेणु कंपनीच्या कंत्राटदाराने पोलिसांना फोन करून बोलावून घेतल्यानंतर शेतक-यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना फोनवरून कल्पना दिल्यानंतर प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेत पवनचक्कीचे पान २ वर...

**पडघम** पुरुषांना पैसे वाटप करतानाचा व्हीडिओ व्हायरल

## अजित पवारांच्या जनसन्मान यात्रेत भाडोत्री गर्दी!

भंडारा/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातील तुमसर येथे शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेनिमित्त सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार तुमसरमध्ये आले होते. सभेला गर्दी झाली, मात्र ही गर्दी भाडोत्री असल्याचे सभा संपल्यानंतर समोर आले. सभा संपल्यानंतर पुरुषांना पैसे वाटप करतानाचा व्हीडिओ व्हायरल झाला. दुसरीकडे, महिलांना १५०० रुपये आणि स्टीलचे डबे देणार असल्याचे सांगून सभेसाठी आणण्यात आले होते, मात्र त्यांना रिकाम्या हाती परतावे लागल्यामुळे महिलांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली.तुमसर येथील नेहरू क्रीडांगणावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे जनसन्मान यात्रेनिमित जनसभा आयोजित करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार येणार म्हणून या सभेसाठी जय्यत तयारी करण्यात आली. भव्यदिव्य सभामंडप उभारण्यात आला. या



कार्यक्रमासाठी ३० ते ३५ हजार लोकांची गर्दी होईल, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार राजू कारेमोरे यांनी शुक्रवारी ठामपणे सांगितले. त्याप्रमाणे कार्यक्रमाला गर्दीसुद्धा झाली, त्यातही महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. त्यामुळेच गुलाबी फेट्यातल्या 'लाडक्या बहिणींचे' कौतुक खुद्द अजित पवारांनी केले. मात्र सभा संपताच या लाडक्या बहिणी आयोजकांच्या नावाने बोटे मोडू लागल्या. कारण या लाडक्या बहिणींना १५०० रुपये आणि स्टीलचा डबा देण्याचे आश्वासन देऊन कार्यक्रमासाठी आणण्यात आले होते. मात्र, या कार्यक्रमानंतर काही महिलांची ५०० रुपयांवर बोळवण करण्यात आली तर काहींना रिकाम्या हाती परतावे लागले. यामुळे महिलांनी संताप व्यक्त केला.सभा संपल्यानंतर पुरुषांना पैसे वाटप करतानाचा व्हीडिओसुद्धा सोशल मीडियावर प्रसारित झाला. काहींना वस्तू वाटप करण्यात येत असल्याचेही या व्हीडिओत दिसत आहे. सभेच्या ठिकाणी जमलेल्या पुरुषांना बाहेर पडताना काही लोक पैसे वाटप करीत आहेत. हा प्रकार समोर येताच काही वॉट्सप ग्रुपवर राजू कारेमोरे समर्थक आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपली. राजकीय कार्यक्रमांना गर्दी करण्यासाठी महिला-पुरुषांना भाड्याने आणले जात असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी तुमसर विधानसभा क्षेत्राचे आमदार राजू कारेमोरे यांच्याशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## वंचित नवनिर्वाचितांचा यथोचित सत्कार!

### अभिनंदनिय: जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, पदाधिकारी यांचा सत्कार



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अजय सरवदे,महासचिव बंडु जाधव, उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर , सल्लागार बबन वडमारे, विष्णू देवकते,अरुण जोजाळ व कार्यकारणी जिल्हा पदाधिकारी यांचा सत्कार बीड तालुकाध्यक्ष अध्यक्ष किरण वाघमारे यांनी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षासह पदाधिकाऱ्यांना फेटा बांधुन, मान्यवरांच्या पान २ वर...

## सुखद स्वयंप्रज्ञेचे सुचिन्ह!

बुद्धिबळपटू हरिका द्रोणावल्लीपुढे आता दोन वैयक्तिक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमुळे पुढे ढकलल्या गेलेल्या आई आणि आजीच्या गुडघेरोपण शस्त्रक्रियांच्या तारखा ठरवून त्या लवकरात लवकर करून घेणे आणि लेक हन्विकाच्या दुसऱ्या वाढदिवसाची तयारी. हरिका 'परफेक्शनिस्ट' असल्याने यात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता तिला घ्यायची आहे; अगदी तशीच, जशी तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या निर्णायक सामन्यातील डावात अझरबैजानच्या गुनाय मम्मदझादाशी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना घेतली होती. अखेरच्या या अकराव्या फेरीत हरिका पहिल्या पटावर खेळत होती आणि तिचा या डावातील विजय महिला संघासाठी फार महत्त्वाचा होता. नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल यांनीही विजय मिळवले, तर आर. वैशालीला बरोबरीवर समाधान मानावे लागले. पण तोवर भारतीय महिला संघाचे सुवर्णपदक निश्चित झाले होते. जागतिक बुद्धिबळाच्या पटावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश संपादन करून भारताने बुद्धिबळविश्वातील महासत्ता होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. यात पुरुष संघाचा खुल्या स्पर्धेतील विजय वर्चस्व सिद्ध करणारा होता, तर खडतर परिस्थितीतून वाट काढत महिला संघाने मिळवलेल्या सुवर्णपदकामुळे या यशाची झळाळी आणखी वाढली.बुद्धिबळाच्या पटावरील भारताचे हे वर्चस्व खचितच सुखद आहे. एरवी आपण क्रिकेटप्रेमात इतके आकंठ बुडलेले आहोतच. पण नव्या शतकाच्या सुरुवातीपासून ही परिस्थिती धिम्या गतीने बदलू लागली आणि इतरही खेळांना प्रोत्साहन मिळू लागले. त्यात जसा विविध क्रीडाप्रकारांत झालेला नव्या प्रतिभावान खेळाडूंचा उगम हे एक कारण, तर त्यांचा खेळ दाखविणाऱ्या आणि त्याद्वारे तो पाहणारे प्रेक्षक निर्माण करणाऱ्या संपर्क साधनांचा विस्तार हे दुसरे. क्रिकेटपायी या खेळांचा अगदीच अनुल्लेख व्हायचा, तो टळून त्याकडे लक्ष जाण्याइतपत आपलीही प्रेक्षक म्हणून कामगिरी सुधारली आहे. बुद्धिबळासारख्या– पाहण्यासाठीही मोठ्या संयमाची मागणी करणाऱ्या – खेळातील यश साजरे होणे, हे त्या अर्थाने दिलासादायक.

बुद्धिबळ हा अस्सल भारतीय खेळ, पण रशिया आणि तत्कालीन सोव्हिएत महासंघ, तसेच पूर्व युरोपातील देशांनी वर्षानुवर्षे त्यावर अधिराज्य गाजवले. अमेरिकाही फार मागे राहिली नाही आणि चीननेही गेल्या काही काळात मुसंडी मारली. एकच घर पुढे सरकणाऱ्या प्याद्यापासून तिरकी चाल करणारा उंट, अडीच घरे उड्या मारणारा घोडा आणि कसाही सरकू शकणाऱ्या वजिरापर्यंतचे मोहरे खेळवणारे बुद्धिबळ शीतयुद्धाच्या काळात हेरगिरीपर्यंत जाऊन पोहोचले होते. अलीकडच्या काळात 'नेटफ्लिक्स'वरच्या 'क्वीन्स गॅम्बिट' या मालिकेमुळे या खेळाला वलय आले आणि नंतर त्याची महिलांचा बुद्धिबळातील सहभाग ते त्यांच्या पेहरावावरून व्यक्त केली जाणारी मते, अशा विविधांगाने चर्चा होऊ लागली. पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते भारताने या खेळात साधिक जेतेपद मिळवणे. ते आता साध्य झाले आहे. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने संघांना सव्वातीन कोटींचे पारितोषिक जाहीर केले, तेही औचित्याचे. कृत्रिम प्रज्ञेच्या आजच्या प्रभावकाळातही मानवी बुद्धीच्या लखलखण्याला इतके मोठे जागतिक परिमाण आहे आणि त्यात भारत अग्रेसर आहे, हे सुचिन्ह.

# ॲटोरिक्षा चालकांनो सभासद नोंदणी करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली असून बीड जिल्ह्यातील ॲटोरिक्षा चालकांनी अर्ज भरुन सभासद नोंदणी करावी असे आवाहन महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे बीड जिल्हाध्यक्ष अमोल (सुग्रीव) शिंदे यांनी केले आहे.

धर्मवीर आनंद दिघे साहेब कल्याणकारी मंडळाच्या स्थापने दिवशीच पन्नास कोटीची तरतूद महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. बीड जिल्ह्यात ॲटो रिक्षांची संख्या पाहता म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नसून या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा. या कल्याणकारी मंडळाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या संधीचे तरुण रिक्षा चालकांनी त्यांच्या व कुटूंबाच्या भविष्यात आर्थिक उन्नतीसाठी सदरील अर्ज भरणे आवश्यक आहे. हे अनुदान नसून कायमस्वरुपी कल्याणकारी मंडळ स्थापन झालेले आहे. या विषयी वेगवेगळ्या अफवा पसरविण्यात येत असून त्याकडे लक्ष न देता सभासद नोंदणी ॲटोरिक्षा चालकांनी करुन घ्यावी. कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे संस्थापक अध्यक्ष बाबा कांबळे हे गेली १५ ते २० वर्षापासून संघर्ष करत होते. यासाठी आंदोलने करावी लागलेली आहेत. महाराष्ट्र रिक्षा पंचायतच्या पिंपरी येथील अधिवेशनात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्थापना करण्याची घोषणा केली होती याचे आम्ही साक्षीदार आहोत.

महाराष्ट्र रिक्षा पंचायत जिल्हा बीडच्यावतीने जिल्हाध्यक्ष अमोल (सुग्रीव) शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज भरण्याची मोहीम सुरु आहे. शहरातील रिक्षा चालकांनी अर्ज भरुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे व दोन फोटो आवश्यक असून आरटीओ कार्यालयात सदरील अर्ज दाखल करण्यात येणार असून एकही ॲटोरिक्षा चालक वंचित रहाणार नाही यासाठी बीड बसस्थानक रिक्षा पॉईंटवर अर्ज भरण्यासाठी जिल्हाध्यक्ष अमोल (सुग्रीव) शिंदे, नाना जावळे, सय्यद अकबर, जाधव महाराज, गणेश टाटोर, प्रकाश ससाणे, बबन मस्के, दिपक लोंढे, संजय भागवत, नवनाथ आवारे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहनही महाराष्ट्र रिक्षा पंचायतच्यावतीने करण्यात आले आहे.

## सुग्रीव शिंदे:शेकडो अर्ज आरटीओ कार्यालयात दाखल



# सरकारने अंत्यविधीची जबाबदारी घेतली

## जागा मिळवून देणं काम होतं: सोमवारी कोर्टात सांगणार; अक्षय शिंदेच्या वकिलाचा संताप

ठाणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा ठाणे पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी (दि.२८) एन्काऊंटर केला होता. मात्र पाच दिवस उलटूनही त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आरोपी अक्षय शिंदेचे वकिल चांगलेच संतापले आहेत. शिवाय, त्यांनी वकिलांना आणि अक्षयच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यात यावं, अशी मागणी केली होती, मात्र तरिही संरक्षण देण्यात आलं नाही, असंही नमूद केलंय.

अमित कटारनवरे म्हणाले, सरकारने अंत्यविधीची जबाबदारी घेतली आहे. मात्र अद्याप दफनविधीसाठी जागा मिळत नाही. जागा मिळवून देणे सरकारचे काम आहे. अंत्यविधी अद्याप झाला नाही. सोमवारी कोर्टात ही बाब मेन्शन करणार आहे. कोर्टात याबाबतची माहिती देणार आहे. आम्ही कुटुंबांसह वकील यांच्या जीवाला धोका असल्याचे सांगितले असून अद्याप कुटुंबासह वकिलांना संरक्षण दिले नसल्याचेही त्यांनी नमूद केलं आहे.

बदलापूरतील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याचा आरोप अक्षय शिंदेवर करण्यात आला होता. दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी एफआयआर नोंदवून घेतली नसल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर आरोपांना ताब्यात घेऊन फाशी देण्यात यावी यासाठी बदलापूर रेल्वे स्थानकावर मोठं आंदोलनही करण्यात आलं होतं. दरम्यान, त्यांनंतर सरकारने आरोपी अक्षय शिंदेला ताब्यात घेतलं. शाळेवरही प्रशासकाची नेमणूक करण्यात आली होती. दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी अक्षय शिंदे यांचं ठाणे पोलिसांकडून एन्काऊंटर करण्यात आलं.



### राज्य सरकारची हायकोर्टात ग्वाही

एन्काऊंटर करण्यात आल्यानंतर ५ दिवस उलटल्यानंतर अक्षय शिंदेंचे अंत्यसंस्कार झालेले नाहीत. त्यांच्या अंत्यसंस्काराला स्थानिक लोकांकडून विरोध होत आहे. त्यामुळे तीन शहरांमध्ये आत्तापर्यंत त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी जागा शोधण्यात आल्या आहेत. शिवाय राज्य सरकारने हायकोर्टात आम्ही अंत्यसंस्काराची जबाबदारी घेऊ, अशी ग्वाही देखील दिली होती. मात्र, अजूनही त्याच्यावर अंत्यसंस्कार पार पडलेले नाहीत.

अक्षय शिंदेंनी पोलिसांवर हल्ला केला, त्यानंतर स्वसंरक्षणासाठी पोलिसांनी त्याचा एन्काऊंटर केला असल्याचा दावा पोलिसांनी केलाय. तर शाळेतील इतर आरोपींना वाचवण्यासाठी तर अक्षय शिंदे याला संपवलं नाही ना? असा संशय शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केला होता.

## पान एक वरून

### अक्षय शिंदे चकमकीचा

मुंब्रा बाह्यवळण मार्गालगत असलेल्या टपरी चालकांकडे त्यांनी त्यादिवशीच्या घटनेबाबत विचारपूस केली. यानंतर ते कळवा रुग्णालयात गेले आणि तिथे चौकशी करून माहिती घेतली. तिथेच त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पोलिसांनी तक्रारीत नोंदवलेली वेळ, घटनाक्रम याचा प्रसंग पुन्हा उभा केल्यावर मला किती वेळ लागला आणि काय नोंद केले, ही सर्व माहिती न्यायालयात मांडणे उचित ठरेल. आता उघड केले तर त्याचा फायदा माझ्या आशिलाला होणार नाही. त्यामुळे या प्रकरणाचा उलगडा लवकरच करेन, अशी प्रतिक्रिया वकील अमित यांनी दिली. मला ज्या ज्या गोष्टी आढळल्या आणि ज्या ज्या गोष्टी सत्य आहेत ,त्या न्यायालयात मांडण्यासाठी त्याचा पुरावा गोळा करण्यासाठी हे करत आहे. आमचा लढा पोलीस राजविरोधात आहे. शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये हा पोलिसीराज कदापि खपवून घेणार नाही. आम्ही सगळे वकील मिळून याचा मुकाबला करू, असे सांगत न्यायालयातूनच न्याय हा मिळाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. पोलीसच न्यायाधीश बनतील हे कदापि खपवून

### केसरी बक्षीस कोण

बैलगाडा सेमी फायनल मध्ये सात बैलगाडा धावतील, अंतिम फेरी सात बैलगाडा यांची असून, त्यातून प्रथम येणारा सोनालिका ट्रॅक्टर म्हणजेच मराठवाडा केसरी पटकावणार आहे. बहुचर्चित मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीमध्ये महाराष्ट्रातील नामांकित बैल बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी यासारख्या धडाकेबाज बैलजोड्या शर्यतीत सहभागी होणार आहेत. शर्यतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येत असून, वैद्यकीय व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे पाणी, बैलांना पाणी आदीसह प्रेक्षकांच्या सुरक्षेसाठी बॅरेकेट बसवण्यात आले आहेत. तरी जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधवानी बैलगाडीचा थरार पाहण्यासाठी बहु संखेने उपस्थीत राहावे असे आवाहान राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. ऑनलाईन नाव नोंदणीकरिता संपर्क – अविनाश नवले– ९९२१११४९५४, ९१३०८८७८८८, अजय सावंत – ९३५९००५८७९

### मांजरा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी

जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागले होते. परंतू यावर्षी मुबलक पाऊस पडला आहे.त्यामुळे सर्वत्र ठिकाणचे जलस्रोत भरले आहेत.यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे असेही म्हणाले की मांजरा धरणातील साचलेल्या पाणी साठ्याची जलपूजन आपल्या हस्ते होत आहे. त्याचा आपल्याला आनंद असून येणाऱ्या काळात आपण सर्वजन मिळून विकासाच्या कामांची पायाभरणी करणार आहोत. कारण जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले आहे. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याचा विकास साधला जाईल. असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी जलपूजन करतावेळी व्यक्त केला.याप्रसंगी माजी आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा संजीवनीताई देशमुख, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर भैय्या देशमुख, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, अंजलीताई घाडगे, रमेशतात्या गालफाडे, शितलताई लांडगे, माजी पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, मुकुंद कणसे, कपिल मस्के, सय्यद शरिफ, केज नगरपालिकेचे गटनेते भाऊसाहेब गुंड, सर्व नगरसेवक, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच पंचक्रोशीतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, सभासद आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पवनचक्की कंपन्यांचा मनमानी

कंत्राटदार आणि पोलिस प्रशासन यांच्याशी संवाद साधला त्यानंतर कंत्राटदाराने संबंधित शेतकऱ्यांना मोबदला दिल्याशिवाय आम्ही पुढील काम करणार नाही असे आश्वासन दिले.आमच्या शेताची अग्रीमेंन्ट कागदपत्रे तयार करून घेतली.मावेजा दिलाच नाही. तुमच्या शेतातुन गाड्या घालणार नाहीत असे सांगितले. ईतर शेतकऱ्यांना मावेजा दिला.परंतु आम्हाला दिला नाही.आता सध्या आमच्या शेतातुन गाड्या घालण्याचा प्रयत्न करत असताना आम्ही गाड्या अडवल्या आहेत.आमची यापूर्वी सुद्धा फसवणूक झाली आहे म्हणून आमचा यांच्यावर भरवसा नाही. आम्ही शेताचा मोबदला दिल्यानंतरच आमच्या शेतातुन गाड्या जाऊ देऊ.अशी आक्रमक भूमिका सुमंत कोळपे आणि ईश्वर कोळपे यांनी घेतली आहे. शेतकऱ्यांनी पवनचक्की कंत्राटदारांच्या गाड्या अडवल्यानंतर कोळपे बंधुंनी माझ्याशी फोनवरून संवाद साधत मदत करण्याची विनंती केली. घटनास्थळी जाऊन पोलिस प्रशासन आणि कंत्राटदार यांच्या समक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधला. कंत्राटदार यांनी कोळपे बंधुंना शेताचा मावेजा देण्याचे मान्य करत नंतरच काम करू असे आश्वासन डॉ. गणेश ढवळे यांना दिले.

### वंचित नवनिर्वाचितांचा यथोचित

हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी सत्कार ला उत्तर देताना नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सर्व ज्येष्ठ व आजी माझी व सोबतच्या पदाधिकाऱ्यांना घेऊन जास्तीत जास्त वंचित बहुजन आघाडी लोकांची संघटना उभारणी करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली, तसेच जिल्हा महासचिव खंडू जाधव यांनी माझा जो सन्मान व निवड केली आहे त्याबद्दल पक्षश्रेष्ठीचे व जिल्ह्यातील नेत्यांचे आभार मानले आहेत.अधिक जोमाने पक्ष वाढीसाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सत्काराला उपस्थित वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, सल्लागार विष्णू देवकते, देवा गव्हाणे,आदी पदाधिकारी सत्कार ला उपस्थित होते. नवनिर्वाचित वंचित बहुजन आघाडी सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## पान सहा वरून

### गणेश मंडळांना कायम

साजरा करत. यावर्षी अमृतकाका सारडा यांच्या सूचनेनुसार देखाव्यांच्या स्पर्धा घेतल्या. पुढीलवर्षी बक्षिसांची रक्कम, देखाव्यांचे स्वरूप, सोहळ्याची व्याप्ती वाढविली जाईल, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उत्कृष्ट देखावा निवड समितीचे प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, व्यंकटेश वैष्णव, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर या परीक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.संजय पाटील देवळाणकर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार फामजी पारीख यांनी मानले. यावेळी अनेक गणेश मंडळांचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१ लाखांचे प्रथम, ५० हजारांचे द्वितीय तर ३० हजारांचे तृतीय बक्षीस** : बालाजी मंदिराची प्रतिकृती साकारणाऱ्या न्यू गणेश मंडळास १ लक्ष रुपयांचे प्रथम बक्षीस देण्यात आले. बद्रीनाथ धामची प्रतिकृती साकारणारे मनोकामना गणेश मंडळ, उज्जैन महाकालची प्रतिकृती साकारणारे वीरशैव गणेश मंडळास द्वितीय क्रमांकाचे प्रत्येकी २५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. तृतीय पारितोषिक आझाद हिंद गणेश मंडळ, छत्रपती जाणता राजा गणेश मंडळास प्रत्येकी १५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. तसेच, दत्तात्रय गणेश मंडळ, राष्ट्रीय गणेश मंडळ, नवरंग गणेश मंडळ, ओझार गणेश मंडळ, महाराणा प्रताप गणेश मंडळ, पुरणदास गणेश मंडळ, समर्थ गणेश मंडळास उत्तेजनार्थ बक्षीस दिले. मंडळाच्या सदस्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व ट्रॉफी देऊन सन्मानित केले. बक्षीस वितरणानंतर सर्वच गणेश मंडळाच्या सदस्यांनी ढोल –ताशाच्या तालावर ठेका धरत जल्लोष केला.

### मॅरेथॉन बैठकीत केली

व ग्रामीण मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांच्याशी सविस्तर अशी चर्चा केली. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने पक्षाला यश मिळवून देण्यासाठी सर्वांनी जोमाने व एकजूटीने कामाला लागण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

### माजलगावमध्ये जनसंवाद

मतदारसंघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे त्या मुळे अनेक महत्त्वाच्या योजना मला या मतदारसंघात राबउ शकलो ग्रामीण रुग्णालयात ,कॅनाल दुरुस्ती ,शहरातील रस्ते ,स्त्री रुग्णालय आदी चे कामे झाले आहेत ,सरकारने सर्वांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी लाडकी बहीण ,सुशिक्षित तरुणांना अर्थ सह्यय ,वृद्धांसाठी अनेक योजना आणल्या आहे त्या साठी सरकार जनसंवाद मेळावा घेत आहे आणि यासाठी १ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री आणि इतर मोठे नेते येणार आहेत त्या साठी मतदार संघातील नागरिकांनि या जाहीर सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान आ प्रकाश सोळंके यांनी या पत्रकार परिषदेतुन केले आहे.

### घरगुती वादातून कुऱ्हाडीने

प्रतीक आव्हाड वय २२ रा.नवीन कावसन यांनी पोलिस कर्मचारी आव्हाड यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचे तक्रार रात्री उशिरापर्यंत पैठण पोलीस ठाण्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. घटनेची माहिती मिळताच उपविभागी पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरक्षक संजय देशमुख यांनी रुग्णालयात जाऊन जखमी पोलीस कर्मचारी व त्यांच्या पत्नीच्या प्रकृतीची विचारपूस करून सदरील प्रकरणी पोलिसांनी दोन हल्लेखोराना ताब्यात घेतले आहे.

### तेलगाव येथे भव्य शेतकरी

अंमलबजावणीत आणण्यासाठी. राष्ट्रीय आपत्ती निवारण कोशातून प्रभावीपणे नुकसान भरपाई मिळवून घेण्यासाठी. महाडीबीटी अंतर्गत वर्षानुवर्ष प्रलंबित असणारे हक्काचे अनुदान मिळवण्यासाठी. अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.ड.अजय बुरांडे, जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ. काशीराम सिरसाट, भगवान बडे, कॉ. पांडुरंग राठोड, जगदीश फरताडे कृष्णा सोळंके, अशोक डाके, कॉ. गंगाधर पोटभरे, विष्णु देशमुख, संजय चोले, राजाभाऊ बादाडे यांनी केले आहे.

### परळी पोलीस कर्मचाऱ्याचा

न करता केवळ कर्तव्य करणे हे जाणून त्यांना मोबाईल परत दिला व पुन्हा दक्षता घेण्यास सांगितले खरे तर आपण पोलिसांबद्दल गैरसमज बाळगून असतो की पोलिसांची पायरी चढली की आपणास ते काहीतरी मागतील किंवा विनाकारण चौकशी साठी अटकळत ठेवतील असे काही न घडता त्यांनी तात्काळ मोबाईल परत देऊन एक प्रकारे कर्तव्य पूर्ण करून इमानदारी व सहानुभूती दोन्हीचेही दर्शन घडविले कुरुडे परिवार अशा इमानदार व कर्तव्यदक्ष पोलिसांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करत आहेत असेच प्रशासन असेल तर समाजामध्ये पोलिसांबद्दल आदर निर्माण होऊन भीती नक्कीच दूर होईल.करिता दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांचे कुरुडे परिवाराने आभार मानले आहेत तरी अशा प्रामाणिक पोलीस कर्मचाऱ्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जरूर दखल घ्यावी . वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा कार्याची दखल घेण्यामुळे कर्मचाऱ्यास काम करण्यास आनंद मिळतो व नैतिक उत्साही वाढण्यास मदत होते.

### स्वपक्षीयांचा घात, नंदकिशोर

केली. मुंदडाच्या सत्तेच्या काळात इथला भाजप संपून गेला. भाजपचे निष्ठावान कार्यकर्ते कुठेही दिसत नाहीत. दोन चार लाभार्थी सोडले तर सगळे भाजपवाले बाहेर फेकले गेले. सर्वात आधी देश, नंतर पक्ष व शेवटी स्वतः अशी भाजपची रचना असताना. पक्षाशी गद्दारी करणारे व शेठची हुजरेगिरी करणारे लोकच भाजपचे म्हणून वावरत आहेत. जे पक्षाला प्राधान्य देणारे कार्यकर्ते आहेत त्यांना शेठने संपवले.

येणाऱ्या काळात भाजपला याची किंमत मोजावी लागेल. जे आज भाजपच्या कार्यकर्त्यां बद्दल घडत आहे तेच या पुर्वी शेठने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत केले. ज्या पक्षाने आमदार केलं तो पक्ष संपवायचा. ज्या मतदारानी मतदान दिले त्याच्या विचाराशी गद्दारी करायची. ज्या नेत्याने ताकद दिली त्या नेत्याला संपवायचं ही निती शेठने आयुष्यभर खेळली आहे. हा माणूस कोणत्याही पक्षात असो, त्या पक्षाला यानं कमकुवत केलं आहे.भाजप नेत्यांनी दिलेला प्रचंड फंड जर हा माणूस पक्ष संपविण्यासाठी वापरत असेल तर भाजपला शत्रूची गरजच नाही. आपल्याच सरकार विरोधात मोर्चे काढणा–या व मोदींना शिव्या देणा–या धर्मपिसाटांना जर हा पैशाच्या पेट्या पुरवत असेल तर आम्ही याला का मते द्यायची अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत.

### किसान सभा थेट

पहिलीच नुकसान भरपाई मिळाली नाही. आता दुसऱ्यांदा पडलेल्या पावसाने शेतकरी हतबल झाला आहे. पहिलेच पंचनामे अर्धवट असताना या आहे. नुकसानीचे पंचनामे कधी करणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. शेतकऱ्यांच्या नशीबी कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ यामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीला आला आहे. मागच्या वर्षीचा भावातील फरक म्हणून पाच हजार रुपये शासनाने फरक देण्याचे घोषित केली आहे ते मिळाले नाहीत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई मिळाली नाही. आता हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. याकडे सरकारने लक्ष देवून लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची मागणी किसान सभेकडून करण्यात आली आहे.या याप्रसंगी किसान सभेचे कॉ. बाबासाहेब बडे, दत्तात्रय गव्हाणे, जालिंदर गव्हाणे, बालाजी कडबाने आदिसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

### आजाद समाज पार्टीच्या

संविधानासाठी अहोरात्र झटत असून त्यांचे हात बळकट करणे तुमच्या आमच्या सारख्या सर्वसामान्य माणसाची प्रश्न संसदेमध्ये मांडण्यासाठी प्रत्येकाने एकजुटीने आझाद समाज पक्षाच्या पाठी खंबीरपणे उभे राहणे काळाची गरज आहे. यावेळी जिल्हा बीड जिल्हा कार्यकारणीचे सय्यद इनाम इनामदार,ड.सदानंद वाघमारे उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना कीर्ती शिंदे म्हणाले की भाई चंद्रशेखर आझाद हे दिल्लीमध्ये राहून भारतीय संविधानाची रक्षा करत असून माता भगिनींना संरक्षण देण्यासाठी व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी संसदेमध्ये आपले कार्य बजावत असून त्यांना पुढील काळात अधिकारी काम करण्याची संधी मिळावी यासाठी आपण स्वतःहून बीड शहरातील प्रत्येक वार्डामध्ये भाई चंद्रशेखर आझाद यांचे विचार तळागाळापर्यंत पर्यंत पोहोचवण्याचे काम करणार आहे सर्वसामान्य नागरिकांना महिलांना भारतीय संविधानाबद्दल जागृती करून महिलांना आत्मसंरक्षण करण्यासाठी व गोरगरीब वंचित दुर्लक्षित लोकांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे काम या माध्यमातून प्रामाणिकपणे करणार असल्याचेही यावेळी त्या म्हणाल्या यावेळी परिसरातील मोहन वारभवण,प्रेम कोरडे,अचान वाघमारे,प्रेरणा गायकवाड,ललिता वाघमारे,पायल शिंदे,राणी बाचुटे ( शाखा अध्यक्ष पूरग्रस्त कॉलनी),आम्रपाली कोरडे,आकांशा वरभवण,सायली चक्रे,सुंदर नाना,छाया शिंदे,अंजली शिंदे,संतोष वाडमारे,कोमल वाघमारे मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# राहुरीत विकासाची गंगा आणणार!

## जयंत पाटील प्राजक्तला पुन्हा संधी द्या

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी प्राजक्त तनपुरे यांना आपण मागील वेळेस निवडुन दिले कर्म धर्म संयोगाने आणि बापुसाहेब तनपुरे यांची पुण्याई उपयोगी आली प्राजक्त तनपुरे यांना राज्यमंत्री पदाची जबाबदारी मिळाली प्राजक्तला पुन्हा संधी द्या विकासाची गंगा राहुरीत आणु असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले

राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा राहुरी येथे आली असता पांडुरंग लॉन्स येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात ते बोलत होते पुढे म्हणाले की प्राजक्त दादा यांनी मंत्री पदाचा माध्यमातून राहुरी मतदारसंघातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात जनतेला न्याय देण्याचे काम केले उद्याच्या निवडणुकीत तुम्हाला प्राजक्त तनपुरे यांच्या पाठी मागे उभे रहायचे आहे खा अमोल कोल्हे म्हणाले की निष्ठा व भावना बदलणाऱ्या नेत्यांना राज्यात थारा नाही जयंत पाटील यांना राहुरीकर मामा म्हणतात मामा ना अभिमान वाटेल अस काम करुन प्राजक्तदादा तनपुरे यांना ५० हजाराचा मताधिक्यानी विजयी करा प्राजक्त तनपुरे म्हणाले की ५ वर्ष कशी गेली कळाली नाही तालुक्याने प्रेम देऊन आमदार केले दिवस रात्र एक करुन त्यांचा ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करत आहे आदरणीय शरद पवार यांनी माझ्या वर विश्वास टाकून मंत्रीपदाची जबाबदारी दिली ती राज्यात विकास कामे मार्गी लावुन सार्थ ठरवलीयावेळी तालुकाध्यक्ष मच्छिंद्र सोनवणे माजी नगरसेवक नंदूभाऊ तनपुरे अनिल कासार बाळासाहेब उंडे सचिनभाऊ तनपुरे ज्ञानेश्वर बाचकर सुनील मोरे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते



### प्राजक्त दादांनी बाजीप्रभू प्रमाणे खिंड लढवली !

लोकसभा निवडणुकीत प्राजक्त दादा तनपुरे यांनी बाजीप्रभूंनी जशी खिंड लढवली त्याचप्रमाणे काम केले संपूर्ण तनपुरे कुटुंबांनी माझ्यासाठी अहोरात्र निस्वार्थ भावनेने रात्रीचा दिवस करून प्रचार केला आगामी निवडणुकीत नगर जिल्ह्यात सर्वात जास्त मताने प्राजक तनपुरे निवडणु येण्यासाठी कामाला लागा असे आवाहन खा निलेश लंके यांनी केले

# कारभार हाकणारा ग्रामसेवक कोण?

## बोंबला:केज पंचायत समितीचे बीडीओ फक्त नावालाच का?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीचा कारभार एक ग्रामसेवक बघत असल्याचे समजले जाते आहे केज पंचायत समितीमध्ये बीडीओचे अधिकारी ग्रामसेवकाला दील्यासारखे झाले आहे कारण बीडीओची अनेक कामे एक भुरटा ग्रामसेवक पहात असल्याची चर्चा नागरिकांन मध्ये होत आहे.

जर पंचायत समितीचा कारभार एका बीडीओ कडे आहे तर मग केज पंचायत समितीच्या बीडीओ काय शेंगा हानायला गटविकास अधिकारी आहेत का?केज पंचायत समिती मध्ये एक ग्रामसेवक असणारा व्यक्ती बीडीओची लॉगीन आयडी वापरतो तसेच त्यांच्या मनावर जनतेची कामे करतो तसेच एखाद्या कामासाठी चंदा दीला नाही तर त्याचे काम अडविले जाते एका ग्रामसेवकाचा एवढा रुबाब वाढला आहे की केज पंचायत समितीचा गटविकास अधिकारी पदाचा पदभार त्या ग्रामसेवका कडे दीला तरी काही हरकत नाही कारण बीडीओ मॅडम पन असुन वळीबा नसुन खोळबा असल्या सारखे झाले आहे तसेच तो ग्रामसेवक टक्केवारी घेऊन एखाद्या कामाची रक्कम जमा करतो जर टक्केवारी दीली नाही तर त्या कामाची रक्कम सोडत नाही तरी एका भुरट्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार बंद करण्यात यावा नव्हे तर बीडीओ मॅडम यांनी गटविकास अधिकारी पदाचा राजीनामा द्यावा कारण एक ग्रामसेवक बीडीओची लॉगीन आयडी वापरतो म्हणजे पंचायत समितीला बिडीओची गरज नाही असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# आज कृषी पुरस्कारांचे वितरण!

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या कृषी पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी सायं. ५ वा. मुंबई येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

कोविड तसेच विविध कारणामुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षातील एकूण ४४८ पुरस्कार राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी मंत्री दादाजी भुसे, मुंबईचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत



होणार आहे.या कार्यक्रमांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार (१), वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार (८), जिजामाता कृषी भूषण पुरस्कार(८), कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार (८), उद्यान पंडित पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (४०), पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार(१०), युवा शेतकरी पुरस्कार(८), अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजनेतील पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. कृषी पुरस्कारांच्या रकमेत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी ४ पट इतकी घसघाशीत वाढ करण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२४ मध्ये घेतला होता. तसेच पुरस्कार विजेत्यांना उपस्थित राहण्यासाठी दैनिक प्रवास भत्ता रकमेत सुद्धा वाढ करण्यात आली होती. या कार्यक्रमास शेतकरी– नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कृषी मंत्री धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे यांनी केले आहे.

# पिकअपने दुचाकीस्वारांना उडविले

## दुर्घटना: एक ठार एक तरुण गंभीर जखमी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

चाळीसगांव कडून येणाऱ्या भरधाव पिक अप गाडीने दुचाकीस्वाराला दिलेल्या जोरदार धडकेत एक ठार तर दुसरा गंभीर जखमी.झाल्याची घटना शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास बनोटी–चाळीसगांव रस्त्यावर मुखेड गावाजवळ घडली आहे दरम्यान अपघातातील गंभीर अवस्थेत असलेल्या एकाचा जळगाव येथील सामान्य रुग्णालयात उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे मृत तरुणाचे नाव जगदीश संजय सोनवणे (वय १९)रा.शिदोंळ वडगाव (ता.सोयगांव) असे आहे.बनोटी नागद रस्त्यावरील मुखेड गावाजवळ शनिवारी (ता २८ )दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली असुन घटस्थळावरुन धडक देऊन फरार झालेली पीकप गाडी ग्रामस्थांनी पुढील गावांना दुरध्वनीद्वारे संपर्क करुन घाटनांद्रा (ता सिल्लोड) येथुन अपघातग्रस्त पीक अप गाडी ताब्यात घेण्यात आली आहे..



शिंदोळ वडगाव येथील जगदीश सोनवणे हा जळगाव येथे आयटीआय कॉलेजला शिक्षण घेत असुन शिक्षणाकरीता लागणारी कागदपत्रे काढण्यासाठी तो गावाकडे आला होता. बनोटी येथुन कागदपत्रे काढुन जगदीश सोनवणे व त्याचा मित्र अतुल गोवर्धन मोरे हे दोघे डीसक्कर गाडी क्रमांक एम.एच .२० डी.झेड.३९६३ ह्या दुचाकीने बनोटी कडुन शिदोंळ वडगाव कडे जात असताना नागद कडुन बैलाने भरलेली महींद्रा पिकअप एम.एच.४६ ई.३२९६ ह्या गाडीने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत जगदिश सोनवणे आणि अतुल मोरे दोघे गंभीर जखमी झाले. मुखेड येथील ग्रामस्थांनी बनोटी रुग्णवाहिका बोलवून गंभीर दोघा तरुणांना उपचारासाठी जळगाव येथील रुग्णालयात नेण्यात आले. उपचारादरम्यान जगदिश सोनवणे याच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा मृत्यू झाला. अतुल मोरे याच्यावर उपचार चालू आहेत. घटस्थळावरुन पीकप घेऊन फरार झालेला गाडीची, अपघाताची माहिती दुरध्वनी द्वारे नागरीकांना मिळाल्याने. पिक अप ला घाटनांद्रा येथे काही नागरिकांनी रोखुन ठेवले होते काही वेळाने उपनिरीक्षक रज्जाक शेख जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे यांनी घाटनांद्रा येथुन अपघातग्रस्त गाडी ताब्यात घेतली आहे सदरील अपघाताची नोंद बनोटी पोलीस चौकीत करण्यात आली आहे. मृत तरुण अत्यंत गरीबीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन घरची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची स्वप्न पहात असतांना अपघातात मृत झाला. त्याच्या पश्चात आई वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे.

# कार्यकर्ता निर्धार मेळाव्यास उपस्थित रहा

## अतुल चव्हाण:माजलगाव येथे होणार मेळावा

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुखदुः खात सहभागी होत आत्मीयतेने सोबत असणाऱ्या मोहनराव जगताप यांनी माजलगाव येथे आज आयोजित केलेल्या कार्यकर्ता निर्धार मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड सर्कल प्रमुख अतुल चव्हाण यांनी माध्यमांद्वारे केले आहे.



माजलगाव येथील जुना मोंढा मैदानात आज रविवार दि.२९ रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव, वडवणी व धारूर तालुक्यातील कार्यकर्त्यांसाठी कार्यकर्ता निर्धार मेळाव्याचे आयोजन मोहनराव जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या औचित्याने राजकारणाची पार्श्वभूमी ठरवण्यासाठी व विधानसभा निवडणुकीत सक्रियतेने सहभाग नोंदवण्यासाठी गेल्या ३० वर्षांपासून माजलगाव विधानसभा मतदार संघातील गावागावातील कार्यकर्त्यांसाठी राब राब राबणाऱ्या माजी आमदार बाजीराव जगताप व छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप यांनी या मेळाव्याचे आयोजन केले आहे. येत्या माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन मोहनराव जगताप यांनी आमदारकीसाठी उभा राहत जगताप कुटुंबियांचे हात बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी, गटप्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन मोहनराव जगताप मित्र मंडळाचे दिंद्रुड जिल्हा परिषद सर्कल प्रमुख अतुल चव्हाण यांनी माध्यमांद्वारे केले आहे.

# केजमधे मटका बुकीचा सुळसुळाट!

## दुर्लक्ष: केजमधे फुटा फुटावर मटका बुकी?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

उपअधिक्षक पंकज कुमावत गेल्या पासुन केज मधे अवैध धंद्याला चांगले हुरूप आलेले दिसत आहे त्याला राजकीय आश्रय पन मिळाला त्यामधे अल्पवयीन मुलीवर लॉज मधे होत आसलेले बलात्कार हे पैसे घेऊन बाहेर दाखवले जातात. ऑनलॉईन गेम गुडगूड्या मटका बुक्या मेन रोडवर चालु आहेत पत्ते जुगार क्लब चालु झाले. बनावटी लायन्सस दाखवुन नाटक करु लागलेत हप्ते देऊन सर्व काही ओपन झालेले आहे मग इतकी सुबत्ता केज मधे आसताना आपले केजचे उपअधिक्षक साहेब पाटोदा मधे धाडी टाकुन शबासकी मिळवत आहेत.




पन केज मधे अवैध धंद्याचा सुळसुळात चालु आसताना दुसर्या तालुक्यात जाऊन इतकी मेहनत घेण्याची गरज नव्हती केज मधले पहिले अवैध धंदे बंद करा अन केज मधे आम्ही नागरीक सत्कार करु असे जनतेमधे नागरिकांना मध्ये सुरू आहे.का असे तर नाही ना फक्त महिन्यांकाठी या अवैध धंद्यावाल्याकडुन येणाऱ्या हप्त्याची चिंता आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. कारण यांच्यावर कारवाई करावी तर महिन्याकाठी येणारा मलिदा आपल्या मिळणार नाही म्हणून ते देखील याकडे कानाडोळा करतात कारण एक विचार जर केला तर या ५९ गावांमध्ये प्रत्येक ठिकाणी ३/४ अवैध धंदे वाले असतात मग यांच्याकडून तर महिन्याकाठी एकत्र केला तर लाखो रुपयांचा हप्ता मिळतो की काय असाही प्रश्न नागरिकांना उपस्थित होत अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# शेतकऱ्यांवर मदतीची टांगती तलवार

## कृषी: ई केवायसी नसलेल्या शेतकऱ्यांना फटका!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

कापूस आणि सोयाबीन अनुदानासाठी शासनाने ई के वाय सी अनिवार्य केली आहे सोयगाव तालुक्यातील पात्र ठरलेल्या २४ हजार १७ शेतकऱ्यांपैकी १५ हजार ८५३ शेतकऱ्यांची ई के वाय सी ची प्रक्रिया पुर्ण झाली आहे त्यामुळे या शेतकऱ्यांना खात्यात कापूस आणि सोयाबीन च्या नुकसानी पोटी हेक्टरी पाच हजार रु अनुदान खात्यात वर्ग होणार असून ई के वाय सी न झालेल्या आठ हजार १६४ शेतकऱ्यांना पात्र ठरवूनही ई के वाय सी अभावी अनुदानाची रक्कम मिळणार नाही तीस सप्टेंबर पर्यंत ई के वाय सी साठी अंतिम मुदत देण्यात आली आहे त्यामुळे वंचीत शेतकऱ्यांना आता एकच दिवस हातात आहे

तालुक्यातील कापूस,सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सण २०२३ मध्ये नुकसान झालेल्या व ई पीक पाहणी पूर्ण केलेल्या पात्र २५ हजार ४०१ शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक सहाय्य मदती साठी पात्र केले होते



परंतु त्यातून एक हजार ४९३ शेतकऱ्यांचा शोध न झाल्याने त्यांना या अर्थ सहयय योजनेतून बाद करण्यात आले आहे परंतु शासनाने ई पीक पाहणी पाठोपाठ ई के वाय सी ची अट अनिवार्य केल्या मुळे पात्र २४ हजार १७ शेतकऱ्यांपैकी १५ हजार ८५३ शेतकऱ्यांची ई के वाय सी ची प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्यामुळे या शेतकऱ्यांना (ता. ०१) पासून खात्यात हेक्टरी पाच हजार रु मदत वर्ग होणार आहे ई के वाय सी न केलेल्या शेतकऱ्यांना योजनेत पात्र ठरवूनही ई के वाय सी न झाल्याने मदतीची टांगती तलवार आहे

## अशोक डक माजलगाव विधानसभा संवाद बैठकीत शक्तिप्रदर्शन

# आता हाबूक ठोकण्याची तयारी करावीच लागेल

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तुमची दिसणारी ताकत आणि सपोर्ट पाहता या वेळी हाबुक ठोकण्याची तयारी मला करावीच लागेल असे स्पष्ट करत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणूक लढवण्याचे संकेत दिले. पक्ष आणि नेता डक यांनी स्पष्ट केला नसला तरी शरद पवार आणि अजित पवार यांच्या आशीर्वादाने मुंबई बाजार समितीत माजलगावचा झेंडा फडकवला हे सांगून अशोक आताही असेच आशिर्वाद मिळाले तर माजलगाव मतदारसंघावरही झेंडा फडकवू असा विश्वास अप्रत्यक्षरित्या व्यक्त केला. माझ्याकडे साधी पिठाची गिरणी नाही. परंतु कार्यकर्त्यांची ताकद माझ्या पाठीशी आहे. राजकीय फडातील विधानसभेची कुस्ती लढण्याची आपली ताकत आहे का नाही चाचपडण्याचा हा निर्णय आहे. आपली इच्छा प्रकट करणे हे काही गैर नाही नाही आपल्या शक्तीची दखल निश्चित राजकीय पक्ष घेतील असा विश्वास व्यक्त करत तुम्हाला आवडेल असाच निर्णय घेतला जाईल असे वक्तव्य अशोक डक यांनी केले.

यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. मुंबई बाजार समितीचे सभापती, ज्येष्ठ नेते अशोक डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची चाचपणी सुरू केली आहे. त्याच अनुषंगाने त्यांनी आज कार्यकर्त्यांची संवाद बैठक आयोजित केली असून या बैठकीला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. संवाद बैठकीच्या माध्यमातून अशोक डक यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले असून हक्काचा माणूस म्हणत डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी दंड थोपटल्याचे चित्र आजच्या संवाद बैठकीच्या माध्यमातून पाहायला मिळाले. विशेष म्हणजे व्यासपीठावर लावण्यात आलेल्या बॅनरवर केवळ महापुरुषांचे फोटो आहेत. कोणत्याही पक्षनेत्याचा फोटो किंवा नावाचा उल्लेख बॅनरवर नाही. त्यामुळे अशोक डक नेमके कोणत्या पक्षाकडून निवडणुकीच्या आखाड्यात उतरतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुपारी उशिरापर्यंत संवाद बैठक सुरूच होती. स्वतः अशोक डक यांनी विधानसभेचा मैदानात उतरण्याचे संकेत दिल्याने माजलगाव मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.



### अशोक डक यांनी दोन्ही पवारांचे नाव घेतले

अशोक डक यांनी आपल्या भाषणात दोन्ही पवारांचे नाव घेतले. शरद पवार आणि अजित पवार यांच्या आशीर्वादाने मुंबई बाजार समितीत माजलगावचा झेंडा फडकवला असे डक यांनी सांगितले. यावरून असाच आशिर्वाद मिळाला तर माजलगाव मतरदार संघावरही झेंडा फडकवू असे स्पष्ट संकेत अशोक डक यांनी अप्रत्यक्षरित्या दिल्याची चचर्चा आहे.

# बीडमध्ये रिपाइंचे निळे वादळ धडकणा

## किसन तांगडे: ऐतिहासिक सत्कार सोहळ्याचे साक्षीदार व्हा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने रामदास आठवले यांचा बीड शहरातील संभाजी महाराज क्रीडांगणावर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५ वाजता भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

बीड शहरात होणाऱ्या भव्य सत्कार सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी बीड तालुका रिपाइंच्या वतीने बीड तालुक्यातील गावा–गावात बैठका घेऊन जय्यत तयारी करण्यात आली आहे. बीड शहरात



५ ऑक्टोबरला होणाऱ्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात बीड तालुक्यातील रिपाइंचे निळे वादळ धडकणार आहे.ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी बीड तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, महिला,गायरान धारक, कार्यकर्ते, सर्कल प्रमुख, शाखा प्रमुख यांनी हजारोच्या संख्येने सामील होऊन निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन करावे. असे आवाहन रिपाइंचे बीड तालुका अध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, सतीश शिनगारे, नवनाथ डोळस, राजू वक्ते, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे, कल्याण सोनवणे, भैय्या वाघमारे,भीमराव घोडेराव, अजित सावंत, भाऊसाहेब दळवी, राजेंद्र शेळके, रतन वाघमारे, नागेश शिंदे, अशोक दळवी, रवींद्र वीर, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, आप्पा पवार, दयानंद उबाळे, अमोल डावकर, बाजीराव वाघमारे आदींनी केले आहे.



## दोन्ही देशांमधील मतभेद कमी करण्यास दर्शविली सहमती

# चीन सैन्य मागे घेण्यास तयार

वृत्तसंस्था

**लडाखः** गत चार ते पाच वर्षांपासून पूर्व लडाखमधील सीमेवर भारत आणि चीनमध्ये तणावाचे वातावरण आहे. मात्र, दोन्ही देशांमधील हा तणाव कमी करण्यासाठी अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरू आहेत. आता चीन आणि भारत पूर्व लडाखमधील नियंत्रण रेषेवरील तणाव संपवण्यासाठी आणि संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने लडाखमधून सैन्य मागे घेण्यासंदर्भात चीनने सहमती दर्शविल्याची माहिती समोर आली आहे.

चीनच्या संरक्षण मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, चर्चेच्या माध्यमातून चीन आणि भारतामधील मतभेद कमी करण्यास सहमती देण्याबरोबरच एकमेकांशी संवाद मजबूत करण्यास आम्ही सहमती दर्शवू.

तसेच दोन्ही देशांना स्वीकारार्ह तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू ठेवण्याचे आम्ही मान्य करतो, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले. यासंदर्भात चीनच्या संरक्षण मंत्रालयाने माहिती दिली असल्याचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. पूर्व लडाखमधील चार वर्षांहून अधिक काळ दोन्ही देशांमधील लष्करी संघर्ष सुरू आहे.

हा लष्करी संघर्ष संपवण्यासाठी आणि दोन्ही देशांदरम्यान डेमचोक आणि डेपसांगमधून सैन्य मागे घेण्याबाबत चर्चा सुरू आहेत. या वादामुळे दोन्ही देशांमधील संबंध तणावपूर्ण झाले होते', असेही चीनच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते झांग झियाओगांग यांनी म्हटले.

### झियाओगांग यांनी केला खुलासा

चीनच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते झांग झियाओगांग यांनी चीनमधील भारताचे राजदूत प्रदीप कुमार रावत यांची भेट घेतली. यावेळी झांग झियाओगांग यांनी म्हटले की, भारत आणि चीनने पूर्व लडाखमधील नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्यासाठी आणि दोन्ही देशामधील प्रलंबित मुद्यांवर मतभेद कमी करण्यासाठी आणि संवाद मजबूत करण्याबरोबरच काही सहमती करण्यास सक्षम आहेत', असे त्यांनी म्हटले. तसेच दोन्ही बाजूंनी शक्य तितक्या लवकर तोडगा काढण्याचेही प्रयत्न असल्याचे झांग झियाओगांग यांनी स्पष्ट केले.

## पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान रुग्णालयात दाखल ;

वृत्तसंस्था

### परिस्थिती चिंताजनक



**चंदीगढ :** पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांना रुग्णालयात दाखल केल्याची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या प्रकृतीबाबत शिरोमणी अकाली दलाचे नेते बिक्रम सिंह मजिठिया म्हणाले की, (ता २६) रात्रीपासून ते फोर्टिस रुग्णालयात दाखल आहे. परिस्थिती चिंताजनक आणि गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या प्रकृतीबाबत अकाली नेत्यांनी एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना माहिती दिली.

एजन्सी एएनआयच्या म्हणण्यानुसार, शिरोमणी अकाली दलाचे नेते बिक्रम सिंह मजिठिया यांनी भगवंत मान यांच्या जलद बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहे; परंतु त्यांनी आपल्या वक्तव्यात मुख्यमंत्र्यांच्या प्रकृतीबद्दल योग्य माहिती न दिल्याची भीतीही व्यक्त केली. मात्र, या मुद्यावर आम आदमी पक्षाचेही वक्तव्य आले असून, त्यात पक्षाने मुख्यमंत्र्यांच्या रुग्णालयात दाखल होण्याचे कारण दिले आहे. अकाली दलाचे नेते बिक्रमसिंह मजिठिया म्हणाले की, सीएम भगवंत मान यांना गुरुवारी रात्री फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## मजुराला आयकर विभागाने पाठवली तब्बल २ कोटींची नोटीस

वृत्तसंस्था




**पाटणा :** बिहारमधील गया भागात राहणाऱ्या एका मजुराला आयकर विभागाने थेट २ कोटी ३ हजार ३०८ रुपयांची नोटीस पाठवली आहे. गया येथील नवीन गोडाऊन परिसरात राहणारे राजीवकुमार वर्मा हे रोजंदारी कामगार असून ते शहरातील जुन्या गोदामात मजुरीचे काम करतात. अचानक आलेल्या या नोटिसीनंतर त्यांना मोठा धक्का बसला आहे.

आयकर विभागाच्या नोटीसनंतर मजूर गेल्या ४ दिवसांपासून कामावर गेलेला नाही. नोटीसनंतर तो चिंतेत असून आयकर विभागाच्या कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. त्यावर त्यांनी पाटणा आयकर विभागाच्या कार्यालयात जाण्यास सांगितले, जिथून याबाबत स्पष्ट माहिती समजू शकते, असे सांगण्यात आले. २२ जानेवारी २०१५ रोजी गया येथील कॉर्पोरेशन बँकेच्या शाखेत मी २ लाख रुपये फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवले होते. पण मुदतपूर्तीपूर्वी काही कामासाठी १६ ऑगस्ट २०१६ रोजी हे पैसे काढून घेतले. त्यानंतर मजुरीचे काम सुरू केले. महिन्याला १० ते १२ हजार रुपये मजुरी मिळत असलेला व्यक्ती काय कर भरणार असेही मजुराने म्हटले आहे.

## टर्मिनेटर स्टाइलचे रोबोट सैन्यात होणार सामील ; सहकारी सैनिकांसोबत संभाषण करणार

वृत्तसंस्था




**ब्रिटन :** जगात अनेक देश स्वतःच्या सैन्यात रोबोट्सना सामील करण्याचा विचार करत आहे. युद्धात मानव सैनिकांना रोबोट सैनिक साथ देऊ शकतील आणि युद्धात विजयी होण्यास मदत करू शकतील का यावर सखोल संशोधन केले जात आहे. यात चीनसारखे देशही सामील आहेत; परंतु अलीकडेच ब्रिटनने या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. ब्रिटन स्वतःच्या सैन्यात प्रसिद्ध हॉलिवूडपट टर्मिनेटरमध्ये दाखविण्यात आलेल्या रोबोटप्रमाणे नवे रोबोट्स सैन्यात सामील करत आहे.

सैन्य प्रमुख टर्मिनेटर शैलीच्या रोबोटचे अनावरण करणार आहेत. हा रोबोट सैनिकांसोबत संभाषण करू शकतो. एआय प्रोग्राम चॅटजीपीटीने युक्त आणि युद्धभूमीत प्रशिक्षण सत्रांदरम्यान हा रोबोट सैनिकांशी बोलू शकेल आणि त्यांच्यासमोर व्यक्त होऊ शकेल. सिमस्ट्राइकर नावाचे यंत्र कुठल्याही व्यक्तीचे शब्द किंवा कृत्यांवर प्रतिक्रिया देतो.

## भारतीयांना लेबनॉन सोडण्याची सूचना

वृत्तसंस्था

### इस्रायल-हिजबुल्ला संघर्ष



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील अस्थिर परिस्थिती पाहता लेबनॉनमध्ये असलेल्या भारतीयांनी त्वरित तो देश सोडावा, अशी सूचना भारत सरकारने केली आहे. तसेच सरकार तेथील भारतीय नागरिकांना भारतात परत आणण्यासाठी योजना तयार करण्यासंदर्भात उच्च स्तरावरून विचार करीत आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. सध्या इस्रायल आणि लेबेनॉनमधील हिजबुल्ला ही संघटना यांच्यात भीषण संघर्ष होत आहे. इस्रायलने या दहशतवादी संघटनेचे कंबरडे मोडण्याचा निर्धार केला असून सातत्याने हिजबुल्लाच्या स्थानांवर हल्ले केले जात आहेत.

आतापर्यंत या हल्ल्यांमध्ये १ हजारांहून अधिकांचा बळी गेला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या देशातील वातावरण शांततेने राहण्यास योग्य नाही. परिणामी, भारतीयांनी हा देश त्वरित सोडावा आणि संभाव्य धोका टाळावा, असे सरकारने स्पष्ट केले आहे. ज्या भारतीयांना लेबेनॉनमध्ये जायचे आहे, त्यांनी त्यांची योजना टाळावी. तसेच जे भारतीय यापूर्वीच या देशात गेलेले आहेत, त्यांनी लवकरात लवकर परतण्याची योजना करावी. तसे न केल्यास त्यांना धोका निर्माण होऊ शकतो, असे भारत सरकारच्या सूचनापत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या या देशात ३,००० हून अधिक भारतीय असावेत असे अनुमान आहे. या सर्वांना सुरक्षितपणे भारतात आणण्यासाठी काय करता येईल, यावर केंद्र सरकार विचार करीत आहे. लेबेनॉनमध्ये इस्रायल-हिजबुल्ला संघर्षाचा प्रारंभ झाल्यापासून प्रथमच भारताने असे सूचनापत्र प्रसारित केले आहे. इस्रायल दक्षिण लेबेनॉनवर सातत्याने मोठे हल्ले करीत आहे. याच भागात हिजबुल्लाचा मोठा प्रभाव असून या संघटनेला इराणचे पाठबळ आहे.

## बांगलादेशातील हिंदू मंदिरांना खंडणीची धमकी!

**ढाका :** बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार थांबत नाहीत. दुर्गापूजेपूर्वी काही मंदिरांना बांगलादेशातील इस्लामिक गटांकडून धमक्या आल्या आहेत. मंदिर समित्यांना दुर्गा पूजा साजरी करायची असेल तर ५ लाख बांगलादेशी रुपये द्यावे लागतील, अशी धमकी देण्यात आली होती. पैसे दिले नाहीत तर पूजा करू देणार नाही. त्याच वेळी, २२ सप्टेंबर रोजी लक्ष्मीगंज जिल्ह्यातील रायपूर भागात मदरशातील काही लोकांनी दुर्गा मूर्ती तोडल्या होत्या. बरगुना जिल्ह्यातील पुतळ्यांची तोडफोड करण्यात आली. हिंदू समाजातील काही लोकांनी या प्रकरणी चितगाव आणि खुलना येथील जिल्हा अधिकाऱ्यांकडे तक्रारीही केल्या होत्या.

## प्रेमी युगुलाच्या भेटीनंतर दोन समाज भिडले

### तुंबळ हाणामारीनंतर दगडफेक, पोलिसांकडून लाठीहल्ला

वृत्तसंस्था

**डेहराडून :** उत्तराखंडमधील डेहराडून रेल्वे स्थानकांवर दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी व दगडफेक झाल्याची घटना समोर आली आहे. एक तरुणी दुसऱ्या समाजातील तरुणाला भेटण्यासाठी रेल्वेस्थानकावर आली होती. या भेटीची माहिती मिळताच काही लोकांनी तरुणाला बेदम मारहाण केली. त्यानंतर तरुणाच्या समाजातील लोक घटनास्थळी पोहोचले व त्यांनी इतरांवर दगडफेक सुरू केली. पाठोपाठ दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी सुरू झाली.

दोन्ही गटांमधील लोकांनी रेल्वेस्थानक परिसरात तोडफोड केली. स्थानकाबाहेर उभ्या वाहनांची तोडफोड केली. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला आणि त्यांनी दंगेखोर जमावावर लाठीहल्ला सुरू केला.

रेल्वेस्थानक परिसरात बराच वेळ तणाव निर्माण झाला होता. काही वेळाने पोलिसांनी या स्थितीवर नियंत्रण मिळवले. मात्र, परिस्थिती अद्याप पूर्णपणे निवळलेली नसून परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे. हाणामारी, दगडफेक व लाठीहल्ल्यात अनेकजण जखमी झाले आहेत.



**कोलकता :** प. बंगालची राजधानी कोलकत्यात सुमारे १५० वर्षांपासून सुरू असलेली ट्राम सेवा बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कोलकत्यातील मोठे सार्वजनिक उद्यान व हिरवळीचे क्षेत्र असलेल्या मैदान ते एस्प्लेनड या वारसा भागातील अपवाद वगळता इतर सर्व ठिकाणची ट्रामसेवा बंद होईल.

## शिगेरू इशिबा जपानचे नवे पंतप्रधान

वृत्तसंस्था

### फुमियो किशिदा यांची जागा घेणार

**टोक्यो :** शिगेरू इशिबा हे जपानचे नवे पंतप्रधान होणार आहेत. ते पंतप्रधान म्हणून फुमियो किशिदा यांची जागा घेणार आहेत. किशिदा यांनी गेल्या महिन्यात पदाचा राजीनामा दिला होता. ६७ वर्षीय इशिबा यांनी शुक्रवारी सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (एलडीपी) नेतेपदाच्या निवडणुकीत २१५ मते मिळवून विजय मिळवला. यामुळे त्यांचे जपानचे पुढील पंतप्रधान बनणे जवळपास निश्चित झाले आहे, असे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

माजी संरक्षण मंत्री राहिलेले इशिबा यांनी साने ताकाइची यांच्या विरोधात विजयी मिळवला. ताकाइची यांना १९४ मते मिळाली. इशिबा याआधीही पक्षाच्या नेतेपदाच्या शर्यतीत जवळ पोहोचले होते, पण २०१२ मध्ये त्यांचा शिंजो आबे यांनी पराभव केला होता. आबे यांची नंतर हत्या झाली होती. शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत इशिबा आणि ताकाइची यांच्यात चुरशीची लढत झाली. या निवडणुकीत विक्रमी नऊ उमेदवार रिंगणात होते. याआधी इशिबा हे एलडीपी पक्षाच्या नेतेपदाच्या निवडणुकीत चार वेळा अपयशी ठरले होते, पण पाचव्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले आहे.

## भारताला स्थायी सदस्यत्व मिळावे!

वृत्तसंस्था

### इमॅन्युएल मॅक्रॉन यांची मागणी

**न्यूयॉर्क :** भारताला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व मिळावे, अशी मागणी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीमुळे भारताच्या त्या दिशेने चाललेल्या प्रयत्नांना एक जोर मिळाला आहे. भारताला सुरक्षा परिषदेश स्थायी स्थान मिळाल्यास ते जगाच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार आहे. तसेच सुरक्षा परिषदेचा विस्तार होणेही आवश्यक आहे, असे प्रतिपादन मॅक्रॉन यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत बोलताना केले.

भारतासमवेत जर्मनी, जपान आणि ब्राझील या देशांनाही स्थायी सदस्यत्व मिळावयास हवे. त्याचप्रमाणे आफ्रिकेच्या दोन देशांनाही हे सदस्यत्व मिळण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सुरक्षा परिषदेत सर्व खंडामधील देशांचा समावेश असावा.

## अवैध उत्खनन रोखण्यासाठी एसओपी जारी

**पणजी :** वाळू आणि गौण खनिजांच्या अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी खाण विभागाने एसओपी जारी केला आहे. अवैध वाळू आणि गौण खनिज उत्खननाच्या घटनांची तक्रार संबंधित अधिकाऱ्यांना करणे गावकऱ्यांना बंधनकारक आहे आणि यासाठीच नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) जारी करण्यात आली आहेत. अवैध वाळू, चिरे तसेच खडी (गौण खनिज) उत्खननावर कारवाई करण्यासाठी गस्ती पथके तयार करण्यात आली आहेत.

## आधार, पॅनकार्ड डेटा लिक करणाऱ्या वेबसाइट ब्लॉक

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** आधार आणि पॅन कार्ड तपशीलांसह भारतीय नागरिकांची वैयक्तिकरित्या ओळखण्यायोग्य माहिती उघड करणाऱ्या काही वेबसाइट सरकारने ब्लॉक केल्या आहेत. गुरुवारी अधिकृत निवेदनात ही माहिती देण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टिमला या वेबसाइट्समध्ये सुरक्षा त्रुटी आढळल्या होत्या. त्यानंतर सरकारने या वेबसाइट्स ब्लॉक करण्यासाठी पावले उचलली आहेत.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणने आधार (आर्थिक आणि इतर अनुदानांचे लक्ष्यित वितरण, लाभ आणि सेवा) कायदा, २०१६ अंतर्गत आधारशी संबंधित तपशील सार्वजनिकपणे प्रदर्शित करण्यास मनाई करणाऱ्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

### राज्याच्या आयटी सचिवांना मिळाले अधिकार

संबंधित वेबसाइट मालकांना आयसीटी पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि त्रुटी दूर करण्यासाठी त्यांच्या स्तरावर करावयाच्या कारवाईबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. आयटी कायद्यांतर्गत, कोणत्याही प्रतिकूल परिणामग्रस्त पक्षाला तक्रार दाखल करण्याचा अधिकार आहे आणि ते ऐंऊ-घ्हशी संपर्क साधू शकतात. राज्यांच्या आयटी सचिवांना याप्रकरणी अधिकार देण्यात आले आहेत. गेल्या आठवड्यात, एका सायबर सुरक्षा संशोधकाने दावा केला होता की स्टार हेल्थ इन्शुरन्सच्या अधिकाऱ्यांनी ३.१ कोटी ग्राहकांचा डेटा विकला होता.

### सरकारची कारवाई



## कर्नाटकमध्ये सीबीआयला 'नो एन्ट्री'

### केंद्रीय यंत्रणा पक्षपाती असल्याचा आरोप

देशोन्नती वृत्तसंकलन

**बंगळुरू :** कर्नाटकमधील कॉंग्रेस सरकारने तपासासाठी सीबीआयला असणारी साधारण स्वरूपाची संमती मागे घेतली. त्यामुळे केंद्रीय यंत्रणा असणाऱ्या सीबीआयला आता कर्नाटकमध्ये तपासासाठी राज्य सरकारच्या परवानगीशिवाय एन्ट्री मिळणार नाही. मैसुरू शहर विकास प्राधिकरणाशी (मुडा) संबंधित जमीन वाटपात घोटाळा झाल्याचा आरोप आहे.

त्या प्रकरणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना चौकशीला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे त्यांना आणि कॉंग्रेस सरकारला भाजप, जेडीएस या विरोधी पक्षांनी घेरले आहे. सिद्धरामय्या यांनी राजीनामा द्यावा, तपास सीबीआयकडे सोपवला जावा अशा मागण्या विरोधकांनी लावून धरल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर, सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी कर्नाटक मंत्रिमंडळाची बैठक झाली.

## गाडीत मिळाले ५ जणांचे मृतदेह

### विष प्राशन करत सामूहिक आत्महत्या

वृत्तसंस्था...



**पुदुकोट्टई :** जिल्ह्यातील नमनसमुद्रम पोलीस स्थानकाच्या हद्दीत घराबाहेर उभ्या असलेल्या कारमध्ये ५ मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. तिरुची-कराईकुडी राष्ट्रीय महामार्गावरील नमनसमुद्रमजवळ एका इमारतीबाहेर उभ्या असलेल्या कारमध्ये बुधवारी सकाळी एकाच कुटुंबातील पाच सदस्य मृतावस्थेत आढळले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्वजण मूळचे तामिळनाडूतील सेलम येथील रहिवासी होते. पोलीस पथक या प्रकरणाचा तपास करण्यात गुंतले आहे.

सध्या सर्व मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आले आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, मणिगंदन नावाच्या व्यक्तीने व्यवसायासाठी कर्ज घेतले होते.

## बिल्किस बानोप्रकरण याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

### गुजरात सरकारची होती याचिका



**नवी दिल्ली :** बिल्किस बानो अत्याचार आणि कुटुंबातील सात सदस्यांच्या हत्या प्रकरणातील दोषी असलेल्या ११ जणांना देण्यात आलेली माफी रद्द करताना गुजरात राज्याविरोधात काही निरीक्षणे सर्वोच्च न्यायालयाने नोंदवली. न्यायालयाच्या या निकालाचे पुनरावलोकन करण्याची मागणी करणारी गुजरात सरकारची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने खुल्या न्यायालयात पुनर्विचार याचिका सूचिबद्ध करण्याचा अर्जही फेटाळला. पुनरावलोकन याचिका, आव्हानाधीन आदेश आणि त्याबरोबर जोडलेली कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिल्यानंतर आम्ही समाधानी आहोत. त्यामुळे पुनरावलोकन याचिका फेटाळण्यात आली आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे.

## भारताचा ग्लोब–ई मध्ये समावेश

### भ्रष्टाचार रोखण्यासाठी भूमिका निभावू शकणार

**बिजिंग :** जागतिक भ्रष्टाचार विरोधी कक्ष ठग्लोब-ई' च्या सुकाणू समितीत भारताचा समावेश झाला आहे. मतदानाच्या अनेक फेऱ्यांनंतर भारताची निवड करण्यात आली आहे. या कक्षाचे कार्यालय चीनची राजधानी बिजींगमध्ये आहे. भारताची निवड झाल्याचा निर्णय गुरुवारी घोषित करण्यात आला. या संस्थेत १२१ देशांचा समावेश आहे. तसेच २९१ प्राधिकारणांचाही समावेश करण्यात आला आहे. सध्या या कक्षाचे पाचवे महाअधिवेशन बीजिंगमध्ये होत आहे. या कक्षाचे पूर्ण नाव 'ग्लोबल ऑपरेशनल नेटवर्क ऑफ अँटिकरप्शन लॉ एन्फोर्समेंट ॲथोरिटीज' असे आहे. भ्रष्टाचाराच्या जागतिक संकटाला रोखण्यासाठी भारत आता एक महत्वाची भूमिका घेऊ शकतो. या क्षेत्रातील भारताचा अनुभव कक्षाला मार्गदर्शक ठरु शकतो. भारत आता या कक्षाचा एक सन्माननीय सदस्य झाला आहे, अशी भलावण या कक्षाच्या अधिकाऱ्यांनी भारताच्या समावेशाची घोषणा करताना केली.

# गणेश मंडळांना कायम पाठबळ दिले

## डॉ.योगेश क्षीरसागर — बीडमध्ये राष्ट्रवादी, कल्पतरूकडून स्पर्धा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गणेशोत्सवात बाल-थोरांचा सहभाग असतो. यावर्षी बीडच्या गणेशोत्सवात प्रचंड उत्साह दिसून आला. खंडीत झालेली देखाव्यांची परंपरा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी गणेशोत्सवात गणेश मंडळांना कायम पाठबळ दिले. पुढील वर्षी त्यांच्या संकल्पनेतील गणेशोत्सव सोहळा घेतला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.



शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व बीड कल्पतरू आयोजित सार्वजनिक गणेश मंडळ देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण शनिवारी (दि.२८) पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, माजी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, शुभम धूत, प्रेम चांदणे, राष्ट्रवादी लिगल सेलचे ड.गणेश तांबारे, सरपंच अमोल बागलाने, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, ईश्वर धनवे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, आमचे ग्रामदैवत नवगण राजुरीच्या गणपतीचा क्षीरसागर कुटुंबाला आशीर्वाद लाभलेला आहे. डॉ.भारतभूषण क्षीरसागर हे स्वतः सहभागी होऊन गणेशोत्सव पान २ वर...

### सन्मान झाल्याचा आनंद :डॉ.सारिका क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या की, गणेशोत्सवात उत्कृष्ट देखावे साकारणाऱ्या मंडळांचा सन्मान करण्याची डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांची परंपरा आहे. त्यांचा आदर्श घेऊन दरवर्षी स्पर्धा घेतली जाईल. पेठ बीड भागात अमृतकाका सारडा यांच्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारण्यात आले. त्यांच्या संकल्पनेला गणेश मंडळांनी साथ दिली. पुढील वर्षी मोठ्या प्रमाणावर गणेश मंडळांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन करून गणेश मंडळांचा सन्मान झाल्याचा आनंद वाटतो, असे डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या.

# वरठाण शिवारात २५ कीलो वजनाचा अजगर



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील शिवारात २५ कीलो वजनाचा एक अजगर सर्पमित्र यांनी पकडुन त्या अजगरास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे...

वरठाण शिवारातील येथील गट न १४३ मध्ये मका पिकाची कापणी केलेला चारा काही मजुर जमा करीत असतांना चाराच्या पेंडीखाली हा अजगर दीसल्याने मजुरांची भांबेरी उडाली तात्काळ सर्पमित्र सलमान पठाण यास बोलवुन शिताफीने हा अजगर पकडुन त्यास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले गेल्या पंधरा दीवसात वाडी,नायगाव परीसरातुन याआधी जवळपास चार अजगर पकडुन जंगलात सोडल्याचे सर्पमित्र सलमान पठाण यांनी सांगितले यावेळी मलखान चव्हाण,रेवणसिंग सोळंके,राजपाल पवार,गुलाब कोळी,गबा मोरे,संजय डोभाळ, पसरराम चव्हाण, शिवदास जानु, ईश्वर चव्हाण,आदी उपस्थित होते

# मॅरेथॉन बैठकीत केली सविस्तर चर्चा

## पडघम:आ.पंकजा मुंडेंनी जिल्हा ढवळून काढला

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या परळी मुक्कामात संपूर्ण जिल्हा ढवळून काढला. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विविध मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या सलग दोन दिवस मॅरेथॉन बैठका घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.



आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे सध्या जोरात वाहू लागले आहे. त्या अनुषंगाने भाजप नेत्या आ. पंकजाताई मुंडे सध्या राज्यभर संघटनात्मक दौरे करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत त्या उपस्थित होत्या. याठिकाणी त्यांनी विविध भागातून आलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्यानंतर लगेच दुसर्या दिवशी त्या थेट जिल्हयात दाखल झाल्या. परळी येथे निवासस्थानी त्यांनी सलग दोन दिवस आष्टी-पाटोदा-शिरुरकासार, केज, माजलगाव आणि परळी शहर पान २ वर...

### जनता दरबारात प्रश्न लावले मार्गी!

विधानसभा मतदारसंघ निहाय बैठकांबरोबरच आ. पंकजाताई मुंडे यांनी जनता दरबार घेऊन जनतेच्या समस्यांचा जागेवरच निपटारा केला. जिल्हयातून तसेच राज्याच्या विविध भागातून अनेक नागरिक व कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन आपल्या समस्या त्यांच्या कानावर घातल्या. या सर्वांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांचे प्रश्न यावेळी आ. पंकजाताईंनी मार्गी लावले.

# माजलगावमध्ये जनसंवाद मेळावा

## आ.प्रकाश सोळंके:मोठ्या संख्येने उपस्थित रहावे



माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकार सद्या अनेक लोक विकास कार्यक्रम राबत असवून सरकारच्या विविध योजनांची माहिती समाजातील शेवटच्या घटका पर्यंत पोहचण्या साठी उप मुख्यमंत्री अजितदादा पवार हे १ ऑक्टोबर रोजी माजलगाव शहरात येत असुन मतदारसंघातील नागरिकांनी या जनसंवाद मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान आ प्रकाश सोळंके यांनी काल केले आहे

माजलगाव मतदारसंघाचे आ प्रकाश सोळंके यांनी काल दि २८ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वा त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजित केले होते या वेळी सभापती जयदत्त नरवडे ,जयसिंह सोळंके ,अच्युत लाटे ,नासेर पटेल ,सभाजी शेजुळ, भागवत भोसले ,सुशांत पौळ ,खलील पटेल आदींची उपस्थिती होती पत्रकारांशी सवांद साधताना आ प्रकाश सोळंके म्हणाले की ,मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री अजित पवार यांनी पान २ वर...

# घरगुती वादातून कुऱ्हाडीने हल्ला

## कारवाई: हल्ला करणारे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

पैठण पोलिस ठाण्यात कार्यरत जमादार रावसाहेब आव्हाड हे आपल्या घरी असताना त्यांचा सख्खा भाऊ व पुतण्याने सहा ते सात जणांच्या टोळक्याने पोलिस कर्मचारी रावसाहेब आव्हाड यांच्या घरी येऊन मिरची डोळ्यात फेकून कुऱ्हाडीने व लोखंडी गजाने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना शुक्रवारी रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या दरम्यान घडले असून या हल्ल्यात पोलीस कर्मचारी रावसाहेब आव्हाड वय ५० व त्यांची पत्नी अलका रावसाहेब आव्हाड वय ४८ हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर पैठण येथील शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छ.संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.






याबाबत अधिक माहिती अशी की पैठण पोलिस ठाण्याचे कर्मचारी रावसाहेब आव्हाड रा. नवीन कावसन पैठण हे पत्नी सह रात्री ९ वाजेच्या सुमारास घराच्या समोरील ओटयावर बसले होते. याचवेळी रावसाहेब आव्हाड यांचे थोरले भाऊ बाळासाहेब आव्हाड, प्रतीक आव्हाड सोबत सात ते आठ जणांच्या टोळक्याने अचानक घरी येऊन मिरची पूड डोळ्यात घालून लोखंडी गजाने व कुऱ्हाडी ने हल्ला चढवला या हल्ल्यात रावसाहेब आव्हाड व त्यांची पत्नी अलका आव्हाड यांच्या डोक्यात कुऱ्हाडी चे वर्मी घाव बसल्याने दोन्ही पती पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. रावसाहेब आव्हाड व बाळासाहेब आव्हाड यांच्यात घरगुती कारणावरून वाद होता हा वाद इतका विकोपाला गेला यातूनच बाळासाहेब आव्हाड वय ४७ ,पुतण्या पान २ वर...

# तेलग ाव येथे भव्य शेतकरी मेळावा

## नियोजन: कॉ.गंगाधरप्पा बुराडे स्मृतिदिनानिमित्त उपक्रम

दिंद्रूड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी खासदार कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती दिनाचे औचित्य साधुन तेलगाव येथे मंगळवारी (ता.१) भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जमाफी, पिक विमा, सोयाबीन-कापुस हमीभाव मिळविण्यासाठी या शेतकरी मेळाव्यात चर्चा होणार असून अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी, कामगार, कष्टकरी दिन-दलित सर्वहारा वर्गाच्या न्यायासाठी जीवन वेचणारे झुंजार स्वातंत्र्यसेनानी, बीड जिल्ह्याचे माजी खासदार, अखिल भारतीय किसान सभेचे राज्यध्यक्ष, कॉ. गंगाधरआप्पा बुरांडे यांचा १६ वा स्मृतीदिन निमित्त मंगळवारी (ता.१ अक्टोंबर) तेलगाव येथील वृंदावन मंगल कार्यालयात संपन्न होत आहे. त्यानिमित्तानेभव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सिटुचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ. डॉ.डी.एल. कराड असणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून किसान सभेचे राज्य सचिव कॉ. डॉ. अजित नवले तर स्वागताध्यक्ष म्हणुन माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कॉ. दत्ता डाके असणार आहेत.



सदरील मेळावा शेती विरोधी धोरणातून कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी.उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव ठरवून शाश्वतपणे तो पदरात पाडून घेण्यासाठी. पिकविमा पारदर्शक बनवून सर्व प्रलंबित विमा पदरात पाडून घेण्यासाठी. सरकारची धोरणे शेतकऱ्यांच्या हिताची करण्यासाठी, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी पान २ वर...

# परळी पोलीस कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभाजीनगर पोलीस स्टेशनचे कर्मचारी श्री खाडे व्ही एम व श्री काळे के डी यांनी यांनी नांदूर वेसयेथील महिला सौ उषा कुरुडे या बाहेरगावी जात असताना अज्ञात महिलांनी पाळत ठेवून त्यांचा मोबाईल बस स्टँड मधून चोरी केला होता परंतु गर्दी व जाण्याच्या घाई मध्ये सौ कुरुडे यांच्या लक्षात आले नाही नंतर अंबाजोगाई येथे घरी फोन करण्यासाठी मोबाईल पाहत असताना तो सापडला नाही तसेच त्या धारूर येथे आपल्या माहेरी गेल्या .. सदरील पोलीस कर्मचारी काळे व खाडे यांनी मोबाईल मधून डायल नंबर पाहून चौकशी केली असता त्यांच्या मुलास विचारणा केली त्यांचा मुलगा प्रा दयानंद कुरुडे हे ही बाहेरगावी असल्याने त्यांनी वडिलांना माहिती देऊन पोलीस स्टेशन ला पाठवले ..

पोलीसांनी त्या चोर महिलांना पकडून झडती घेतली असता त्यांच्याकडे यांचा मोबाईल व आधार कार्ड तसेच पर्स मिळाली ..त्यांनी त्यांच्या मुलास संपर्क साधला असता तेही बाहेरगावी असल्याने पुन्हा संपर्क साधून मोबाईल परत घेऊन जाण्यास सांगितले मुलाने त्यांच्या वडीलाना श्री केशवराव कुरुडे यांना पाठवून मोबाईलची,पर्स ची खात्री करून त्यांच्याकडून परत घेऊन त्यांना धन्यवाद दिले त्या दोन्ही कर्मचाऱ्यांनी कसल्याही प्रकारची अपेक्षा



माजलगाव : सपोनि राम पालवे यांची पोलीस निरीक्षक पदावर प्रमोशन झाल्याबद्दल सत्यशोधक ओबीसी परिषदेकडून पुष्प गुच्छ देऊन सत्कार करताना बाळासाहेब सोनटक्के, यावेळी सपोनि मुंडे, माकणे, बीट अंमलदार मोरे आदी.

# स्वपक्षीयांचा घात, नंदकिशोर मुंदडांची नीती!

## चर्चा :आ.नमीता निवडून येण्याचे फक्त स्वप्न बघा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या नंतर विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे. पंकजा मुंडे यांना मुंदडानी निवडनुकीत धोका दिल्याची चर्चा सुरु झाली होती व लोकसभेत भाजप विरोधात काम करणारे सेठच्या भोवती दिसू लागले व भाजप समर्थक मतदारांची खात्री पटली. ज्यांनी पंकजाताई मुंडे यांना पाडण्यासाठी जीवाचं रान केले त्यांना शेठ बळ देण्याचं काम करु लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बद्दल द्वेषाची भाषा बोलणारे व देवेंद्र फडणवीस आणि भाजप बद्दल गरळ ओकणारे गुत्तेदार भाजपनेत्यांनी दिलेल्या फंडावर पोसले जाऊ लागले. मुंदडा यांच्या विश्वासघातकी धोरणाने भाजपच्या मतदारात अस्वस्थता निर्माण झाली. ज्याला मतदान देऊन निवडून दिलं तोच जर विश्वासघात करत असेल तर भाजप ला मतदान करायचे कशाला अशी चर्चा सुरु झाली.मुंदडाने भाजप मतदाराशी गद्दारी केली हे खरं आहे



पण शेठ कुणाशी इमानदार राहिले आहेत ? ज्या स्वर्गीय गोपीनाथ मुंडेंनी त्याना पहिल्यांदा आमदार केलं त्यांनाही झटका देवून मुंदडांनी शरद पवारांना मिठी मारली. कॅबिनेट मंत्रीपद देणा-या शरद पवारांचा विश्वासघात केला. राष्ट्रवादी ने तिकीट डिक्लेर केल्यावर दुसरा पक्ष गाठून राष्ट्रवादी च्या तोंडाला काळं फासलं. महाराष्ट्रभर आपल्याच पक्षाची बदनामी पान २ वर...

## अस्मानी — परतीचा पावसाने होत्याचे-नव्हते झाले

# किसान सभा थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परतीच्या पावसाने बीड जिल्ह्यात पावसाने पुन्हा थैमान घातले.अतिवृष्टीमुळे थोडा-फार हातातोंडाशी आलेला घास देखील या पावसाने हिरावला. सोयाबीनच्या शेंगांची गळती झाली तर वेचणीस आलेल्या कापसाच्या वाती झाल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मानसिक पाठबळ देण्यासाठी किसान सभेने परळी तालुक्यातील अनेक गावातील शिवारातील शेतकऱ्याच्या शेतामध्ये जाऊन उभ्या पिकाच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करत बळीराजाला तातडीने मदत करावी अशी मागणी किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी केली.



परतीच्या पावसामुळे नद्या, नाले, ओढे खळाळले असून नदीला आलेल्या पुरामुळे सध्या सोयाबीन, कापूस शेतकऱ्यांच्या शेतात उभे असून सोयाबीन काढणीसाठी आले असताना जोरदार पडलेल्या पावसामुळे सोयाबीनच्या शेंगांना गळती लागली तर वेचणीसाठी आलेला कापसाच्या पावसामुळे वाती झाल्या आहेत.काही दिवसांपूर्वी अतिवृष्टी झाली होती. त्याचेच पंचनामे पूर्ण झाले नाहीत तर आता परतीच्या पावसाने पुन्हा शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पान २ वर...

### ...तर संघर्ष तीव्र करणार: कॉ.अजय बुरांडे

परतीच्या मान्सून मध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेतकऱ्यांच्या कापूस आणि सोयाबीन पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास अतिवृष्टीमुळे निसर्गाने हिरावून घेतला. यामुळे एकीकडे आसमानी संकटाशी सामना करणारा बळीराजा दुसरीकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे सुलतानीच्या कचाट्यात सापडला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत मदत करावी अन्यथा किसान सभेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी आणि शेतमजुरांना एकत्र घेऊन शासनासोबत आम्हाला संघर्ष करावा लागेल अशी प्रतिक्रिया किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे यांनी दिली.

# आजाद समाज पार्टीच्या बीड शहराची धुरा

## अभिनंदनिय:महिला सामाजिक कार्यकर्त्या कीर्ती शिंदेंची निवड



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पूरग्रस्त कॉलनी बीड येथील महिला सामाजिक कार्यकर्त्या कु. कीर्ती शिंदे यांची आजाद समाज पार्टी कांशीराम च्या बीड शहराध्यक्षपदी निवड महाराष्ट्र अध्यक्ष महिला आघाडीच्या नेहा ताई शिंदे यांच्या सांगण्यावरून खासदार ड. भाई चंद्रशेखर आजाद यांचे हात बळकट करण्यासाठी व महिलांचे प्रश्न शासन प्रशासन दरबारी मांडण्यासाठी बीड जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांच्या हस्ते बीड शहराध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले यावेळी आझाद समाज पक्ष जिल्हाध्यक्ष आशिष चव्हाण उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की देशामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय अत्याचार होत असून त्याला वाचा फोडण्यासाठी महिलांनी स्वबळावर लढण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार भाई चंद्रशेखर आझाद रावण हे महिलांच्या संरक्षणासाठी व भारताच्या पान २ वर...